म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ४८९
REFBK-0019494
REFBK-0019494

म. ग्रं. सं. ठाणें



# बाहुलीचें लग्न

REFBK-0019494
REFBK-0019494

सोल एजंट:—

ए. पी. पापट ॲंड ब्रदर्स,
बुधवार–पुणें सिटी.

# बाहुलीचें लग्न !

“ जननीजनकज ”

काव्य
सं.का.

सुबोध–साहित्य–संग्रह.

मोल पाऊण आणा.

“ व्यर्थी अधिकच अर्थ असे ”

[ आपल्याला जें व्यर्थ वाटत असतें तें खरोखर पाहिलेंअसतां निरर्थक नसतें; त्यांत पुष्कळ अर्थ असतो. ]

—केशवसुत.

मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले; सेक्रेटरी,
श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स; ४९५ शनवार पेठ पुणें शहर.

प्रकाशकः—विष्णु अनंत देशपांडे,
१३५ शुक्रवार पेठ, पुणें.

१०८५६

# तरतरीत विद्यार्थी!

**आण्णा जोशीः**—( हातांत इतिहास धरून पेंगत ):—काय रे झसोबा शिवाजीनं दादोबा कोंडदेव मेल्याबरब्बर काय केलन् ? ( कांहीं वेळ थांबल्यावर उत्तर नाहींसें पाहून ) हे झशा, गाढवाच्या लेका तुला विचारतोय ना ? तोंड-बिंड कांहीं आहे कां नाहीं ? कां बसली वाचा ? ( पेंगाची डुलकी खाई तों उत्तर नाहींसें पाहून पुढल्या स्टुलावर काढून ठेवलेला रुमाल डोक्यावर उलटा चढवतात आणि खालची छडी स्टुलावर दोनचार वेळ आपटतात. नंतर ) ए झसकर मी आतांपर्यंत काय भिंतीला विचारीत होतो होय ?

**विद्यार्थीः**—नाहीं, सर ! झसोबा, झशा, गाढवाच्या लेकांला विचारत होतात.

**आण्णाः**—तूं—तूं—सांग, दादोबा मेल्याबरोबर शिवाजीनं काय केलनं ?

**विद्यार्थीः**—त्याला फुकून टाकला सर !

**आण्णाः**—अस्सं काय ?.........हा दादोबा कोण रें ?

**विद्यार्थीः**—लघुव्याकरणाचा कर्ता सर !

**आण्णाः**—तूं शुद्धीवर आहेस कां ?

**विद्यार्थीः**—तर सर, परवां व्याकरणाच्या तासाला तुह्मी नाहीं कां ह्मणालात कीं तूं दादोबाचं पाह्यलेंस कां म्हणून ?

**आण्णाः**—गागाभट कशासाठीं आणला होता रे ?

**विद्यार्थीः**—खोडशीच्या धरणावर दादोबाला जाळला तेव्हां त्याला मंत्राग्नि देण्यासाठीं शिवाजीनं आणला.

**आण्णाः**—काय झसकर ! हीं अशींच उत्तरं द्यायचीं कां ? तूं आज अभ्यास केऽलायस कां ?

**विद्यार्थीः**—सर, तुह्मी सांगितलत् कीं सकाळीं उठून खोडशीच्या दगडू पाटलाला सांगून ये जा कीं कासराभर दिवसाला घाण्याची सगळी तयारी करून ठेव, मी हांतरुणातनं उठलो कीं तांब्या घेऊनच तिथं येतों. तिकडनं जाऊन आलों तों माझे पाय रवरवत होते सर !.........

**आण्णाः**—इकडे ऽ ये, माझे ही हात शिवशिवताहेत. ( असें म्हणून आण्णांनीं छडी उगारली. पण विद्यार्थ्यानें ती आपल्या मुठींत आवळून धरली. झांकली मूठ सव्वालाखाची ! )

# बाहुलीचें लग्न

मानवतेच्या मधुर मुळीं वागडणाऱ्या गोड मुली
आनंदाच्या मूर्ति भल्या आनंदांतच ज्या रमल्या
जबाबदारी जयां न न्यारी
मजा करोनी मजा विणें मजाच ज्यांचें होय जिणें ॥ १ ॥

ज्यांच्या गाना स्वर नलगे काव्य न ज्यांचें शब्द बघे
अर्थ नुमजतां ज्या लिहिती अशद्ब काव्यें रोज किती
(विश्ववांग्मयीं सुंदर काव्यीं
शब्द, ध्वनि, संकेत तऱ्हा मूकापुढतीं रद्द खऱ्या) ॥ २ ॥

गोजिरवाण्या अशा कळ्या एके ठायीं जमलेल्या
नुमलुनि गेल्या उमलोनी परस्परांना पाहोनी
सूर्या बघतां दगडा द्रवता
वारा भेटीला येतां पुष्प गंध दे त्यास स्वतां ॥ ३ ॥

जमवुनि अपुलें मेतकुट तयीं ठरविलें कांहिं चट
यंत्राच्या चांकासम त्या घेऊं लागल्या पळि फिरक्या
चुली मांडुनी दिला उडवुनी
संसाराचा नव थाट एका क्षणिं विनबोभाट ॥ ४ ॥

बाल्यांतिल हा प्रौढपणा प्रौढपणीं घे बालपणा
विचार दे हा ताप मना त्यास शांतवी प्रभुपवना !
क्षणीं सुखाच्या आनंदाच्या
हवी कशाला विषण्णता बाल्यगुलाबीं नच कांटा ॥ ५ ॥

अग्नीवांचुन अन्न शिजे पाण्यावांचुन हात भिजे
भर दिवसाही हो रात्र अन्नावांचुनि सुरु सत्र
संबंधाविण तो ये होउन
क्षुल्लक माती ही तेथें सोनेंमोलानें विकते ॥ ६ ॥

घटोत्कची ही सृष्टि नव्हे | बघतां बघत्यां जी फसवे
सृष्टि असे ही भावाची | मोदीं मुरल्या हृदयाची
हृदयभावना | घडवी घटना
विधिलाही जी शक्य नसे | प्रभुला पाजुनि पुण्य पिसें ॥ ७॥

हृदयभावना वज्र दुजें | बुद्धिवाद तो तेथ थिजे
विचार कर्तृत्वा नाशी | हलवि भावना गुरुगिरिशी
तीच भावना | देत चालना
बालांच्या त्या संसारा | मोदच भरला जिथें खरा ॥ ८ ॥

आनंदाच्या बागेंत | वसंत ये मग वागडत
आंब्यावांचुन होय पन्हें | गुऱ्हाळ नसतां रसपानें
रसावांचुनी | गुऱ्हाळ करुनी
प्रौढपणा घे करूनि हंसें | बाल्य लावितें ह्मणुनि पिसें॥९॥

एक बालिका दुसरीला | सविनय करिते विनतीला
पदरीं घ्या मम पोरीला | ( त्या चिंध्यांच्या बाहुलिला )
प्रौढपणा जाधिं | मुलीस चिंधी—
समजुनि लावी वाट तिची | नसते स्मृति या खेळाची॥१०॥

शक्य न होणें बाल पुन्हां | होण्या जरि ये नित पान्हा
तृप्त जरि मी रसिक बनें | काव्य न नशिबीं जर होणें
पिक न जरि मी | श्रोता नामी
साखर जरि ना तरि मुंगी | बनतां होइन धन्य जगीं ॥११॥

लटोपटीच्या त्या विहिणी | हीन न बनल्या लटपटिनीं
-करुनि तयारी लग्नाची | माय मुलाची नच नाची
माय मुलाची | माय मुलीची
माया करिती परस्परां | जोड जिला ना जगीं जरा ॥१२॥

बालांचा तो आइपणा | कौतुकें खुलवी मदिय मना
उच्छृंखलतेमध्यें हें | नटलें गांभीर्यच आहे
विरोध नसतां | भासे परता
काव्यगुणाची कमाल ही | महती पावे इनें मही ॥ १३॥

हुंज्यापांड्याचा हट्ट बसला घेउनियां हट्ट
मुकेपणाच्या वाजंत्री झडुनी कानां तोषविती
रुसवा फुगवा नव्हता नांवा
मजा लुटावी सकलांनीं बाल्य मजेची मधु खाणी ॥१४॥
मुहूर्त धरुनी मनचाच लग्न लागलें मग सांच
मंगलाष्टकें हवीं कशा ? मंगल भरतां सर्व दिशां
मंगलतेच्या भागीरथिचा
धोत सारखा वाहतसे अमंगळाला वाव नसे ॥१५॥
मिळतां राजाला राणी खुलल्या खेळांच्या राणी
पंगत बसली लग्नाची साधेपणच्या थाटाची
भात-चुरमुरे लाडु-हरबरे
शिपा-चांदीचीं ताटें बघत्या व्यर्थहि अर्थ वितें ॥१६॥
वरात होतां एकसरें नांव ठेवुनी लग्न सरें
ठेवा नांवच येथ कसें ? वरात वधुपक्षीय नसे
" चट्टामट्टा बाळंभट्टा "
करुनि शेवटीं खेळ सरे जेथें तेथें सुख पसरे ॥ १७ ॥
जोंवर कांहीं ना कळत वयांत असते समजूत
समज वयामधि जों येई समजूतीचें वय होई
आजकालच्या या जगताचा
अनुभव आहे हाच मुळीं फुलाहुनी ही वंद्य कळी ॥१८॥

REFBK-0019494
REFBK-0019494
मराठी ग्रंथ संग्रहालय
१२८८

# आमचे संग्रहांत–

| | |
|---|---|
| चिमुकली इसापनीति– | किं. आणे ८२ |
| मुलांकरितां मुलांच्या गोष्टी– | ,, ८३ |
| पांच कविता | ,, ८२ |
| बालबोध गोष्टी भाग १ लां, | ,, ८३ |
| बालबोध गोष्टी भाग २ रा, | ,, ८३ |
| बालसुभाषित | ,, ८३ |
| पाठात्मक अंकगणित भाग १ | ,, ८५ |
| ,, ,, भाग २ | ,, ८६ |
| सोपे धडे | ,, ८३ |
| बालरंजनमाला भाग १ ला. | ,, ८५ |
| बालबोध संत | ,, ८४ |
| सुभे कल्याण | ,, ८६ |
| नफा तोटा | ,, ८२ |
| दशकपद्धति व मेट्रिक सिस्टीम | ,, ८४ |
| नारायणरावांचा खून व माधवरावांचें लग्न | ,, ८४ |
| नेपोलियन | ,, ८१२ |
| भूस्तरशास्त्र | ,, ८४ |
| आरोग्यशास्त्र | ,, ८१२ |
| थोरले माधवराव पेशवे | ,, ८४ |
| मराठी गद्याचा इंग्रजी अवतार | किं० रुपये २ |
| आपलें पुणें | आणे ८१ |
| महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास | ,, ८४ |
| कमला (काव्य) ले. विजनवासी | ,, ८४ |
| बॅ. विनायकराव सावरकर | ,, ८३ |

# बालदर्श.

## अर्थात्

# मुलींकरितां दहा सुरस कथा

**‘ केसरी ’कार** म्हणतात,

“ पुराणांतील नेमक्या स्त्रीविषयक गोष्टी निवडून काढून त्यांतील नीतिपर उपदेश मुलींच्या मनावर बिंबविण्याकरितां हें पुस्तक रचलें आहे. यांत दिलेल्या दहा कथा लेखकाचा इष्ट हेतु सिद्धीस जाईल अशाच आहेत. ”

**‘ स्वतंत्र हिंदुस्थान ’** कारः—

—“ प्रत्येक आईबापानें हें पुस्तक आपल्या मुलींना जरूर वाचावयास द्यावे. ” ।किंमत ८३ आणे.

---

# तरुण-देशा-करितां !

आपल्या परिस्थितिला बोधपर होईल अशी या देश-भक्तिपर गाण्याची रचना आहे. एकवेळ वाचाच ! विक्रीस तयार पुस्तक किंमत अवघी पाव आणा.

**सुबोध-साहित्य-संग्रह,**

कसबा-पेठ, २३०, पुणें शहर.